सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधीक्षक कार्यालय, ठाणे ग्रामीण
एअर मार्शल हेमंत चिटणीस मार्ग, कोर्ट नाका, खारकर आळी, पोलीस स्कुल समोर ठाणे पश्चिम-४००६०१,
E-MAIL ID – lcb.thane.r@mahapolice.gov.in दूरध्वनी क्र. ०२२-२५३४३५६७

---

प्रेस नोट क्र. ०५ दिनांक :- २९/०२/२०२४

# मोबाईलची चोरी करणारे गुन्हेगारास स्थानिक गुन्हे शाखा, ठाणे ग्रामीणचे पोलीसांकडुन अटक

दिनांक ०७/०७/२०२३ रोजी ००.१५ वा ते ०७.०० वा चे दरम्यान यातील फिर्यादी श्री. मुकेश कुमार प्रशुप्रसाद गुप्ता वय २३ वर्षे रा. मु. पो. शेई ता.शहापुर जि.ठाणे हे त्यांचे कामाचे ठिकाणी बांधलेल्या पत्र्याचे शेड चे बाहेर उघडयावर त्यांचा मोबाईल उशीजवळ ठेवुन झोपले असताना कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादी यांचा २०,०००/- रुपये किंमतीचा विवो कंपनीचा वि २० मॉडेलचा मोबाईल फिर्यादीचे संमतीशिवाय चोरुन नेले बाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारी वरुन वाशिंद पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद क्रमांक १४७/२०२३ भादंविसंक ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला

मा. श्री. डॉ. डी. एस स्वामी, पोलीस अधिक्षक, ठाणे ग्रामीण तसेच श्रीमती दिपाली घाटे, अपर पोलीस अधिक्षक, ठाणे ग्रामीण यांनी मालमत्तेचे गुन्हे उघडकीस आणणे कामी स्थानिक गुन्हे शाखा, ठाणे ग्रामीण यांना आदेश देवुन मार्गदर्शन केले त्याप्रमाणे श्री. सुरेश मनोरे, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, ठाणे ग्रामीण यांनी ठाणे ग्रामीण जिल्हयातील मालमत्तेचे गुन्हे उघडकीस आणणे कामी वेग-वेगळे पोलीस पथके तयार करुन त्यांना मार्गदर्शन केले. सदर पथकाने गुप्त बातमीदारामार्फत तसेच तांत्रीक तपास करुन कोणताही धागा दोरा नसताना अथक परीश्रम घेवुन आपले गुप्त बातमीदारांचे मार्फतीने सदरचा गुन्हा करणारा आरोपीताचा शोध लावुन इसम नामे सुरज संतोष खुपसे वय १८ वर्षे रा. मु. हिव पो. अदांड ता. शहापुर जि.ठाणे यास ताब्यात घेवुन त्यांचेकडे कौशल्य पुर्ण तपास केला असता त्यांनी सदरचा गुन्हा केल्याची कबुली देवुन गुन्हयात चोरलेला २०,०००/- रुपये किंमतीचा विवो कंपनीचा वि २० मॉडेलचा मोबाईल काढुन दिल्याने तो हस्तगत करण्यात आलेला आहे. त्यास पुढील कार्यवाही कामी वाशिंद पोलीस ठाण्याचे ताब्यात देण्यात आलेले आहे.

सदरचा गुन्हा स्थानिक गुन्हे शाखा, ठाणे ग्रामीणचे श्री. सुरेश मनोरे, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि/ श्री.भास्कर जाधव, पो.उप.निरीक्षक श्री.महेश कदम, पो.हवा/ संतोष सुर्वे, पो.शि/ स्वप्नील बोडके यांचे पथकाने उघडकीस आणलेला असुन, गुन्हयाचा पुढील तपास वाशिंद पोलीस ठाणे करीत आहेत.

*************************************************************************